06 AUG 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लिंगभेदाचे राजकारण संपले, तरच मानवमुक्तीचा स्वर वाढणार

## अविनाश सप्रे : डहाके, पिंकी शेख यांना 'काळसेकर काव्य' पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** समाज आणि साहित्यातून लिंगभेदाचे राजकारण संपले, तरच मानवमुक्तीचा स्वर वाढणार आहे. त्यादृष्टीने सर्वांकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी शुक्रवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठात त्यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी, समीक्षक वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर कवयित्री दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. वसंत डहाके यांच्या कविता साठोत्तर कालखंडातील सर्वश्रेष्ठ कविता आहेत. वर्तमानाचे दर्शन त्यांच्या कवितेतून घडते. समाज, भाषा, आदी सर्व स्तरावरील 'कुरूप' कवितेतून दाखविण्याचे धाडस दिशा पिंकी शेख यांनी केले. काळसेकर हे साठोत्तर कालखंडातील अस्वस्थतेचे दर्शन घडविणारे साहित्यिक, कवी होते, असे प्रा. सप्रे यांनी सांगितले. आनंदीआनंद म्हणजे साहित्य नव्हे, तर आक्रंदन म्हणजेही साहित्यच असते. चांगला लेखक नाही, तर किमान चांगला वाचक होण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. या कार्यक्रमास सुप्रिया काळसेकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, व्यंकाप्पा भोसले, मेघा पानसरे, उदय नारकर, माया पंडित, तनुजा शिपूरकर, प्रभा गणोरकर, अरुण शिंदे, आदी उपस्थित होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी भूमिका मांडली. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.



शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे ज्येष्ठ कवी वसंत डहाके, कवयित्री दिशा पिंकी शेख यांना, ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी रणधीर शिंदे, सुप्रिया काळसेकर, डी. टी. शिर्के, व्ही. एन. शिंदे, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

सतीश काळसेकर यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याचा जितका आनंदाचा तितकाच दुःखाचा क्षण आहे. त्यांनी थोडकीच पण, लक्षवेधी कविता लिहिली. चळवळींत रस आणि योग्य राजकीय भान असणारा हा कवी होता. वाङ्मय ही जगण्याची शिदोरी. त्याला विसरणे म्हणजे जगण्याला विसरण्यासारखे असल्याचे वसंत आबाजी डहाके यांनी सांगितले.

कोल्हापूरशी जुने नाते असून येथील मातीत लढण्याचे बळ देते. काळसेकर पुरस्काराने शब्दाची किंमत वाढली. माझ्या समुदायातील ज्या भगिनी व्यक्त होऊ शकल्या नाहीत त्यांच्या डायऱ्या आता उघडल्या जातील. पोट भरलेल्या साहित्यिकांच्या रूपकांची छाप उपाशी साहित्यिकांच्या साहित्यावर उमटत असून हे वास्तव बदलण्याची वेळ आली असल्याचे दिशा पिंकी शेख यांनी सांगितले.

0 6 AUG 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लिंगभेदाचे राजकारण नाहीसे करण्याची गरज

## प्रा. अविनाश सप्रे; वसंत आबाजी डहाके, दिशा पिंकी शेख यांना काळसेकर पुरस्कार

**कोल्हापूर, ता. ५ :** मानवमुक्तीचा स्वर मोठा होण्यासाठी साहित्यातील आणि समाजातील लिंगभेदाचे राजकारण नाहीसे करण्याची तीव्र गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठातर्फे सतीश काळसेकर काव्य पुरस्कार २०२२ व ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार २०२२ वितरण सोहळ्यात ते बोलत होते. प्रा. सप्रे यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी व समीक्षक वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार देण्यात आला. अनुक्रमे २१ हजार रुपये आणि दहा हजार रुपये, शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व ग्रंथभेट असे पुरस्कारांचे स्वरूप आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके आणि कवयित्री दिशा पिंकी शेख यांना काळसेकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी डावीकडून डॉ. रणधीर शिंदे, प्रा. अविनाश सप्रे, सुप्रिया काळसेकर, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. विलास शिंदे आणि डॉ. नंदकुमार मोरे.**

प्रा. सप्रे म्हणाले, ''मी कवी आहे, म्हणून मी आहे,' असे म्हणणारा ओतप्रोत कवी माणूस म्हणजे डहाके आहेत. साठोत्तरी कालखंडातली मराठीतील श्रेष्ठ दर्जाची कविता त्यांची आहे. त्याचप्रमाणे घडणाऱ्या-बिघडणाऱ्या वर्तमानाचे दर्शन घडविणारीही त्यांची कविता आहे. मूलभूत तात्त्विकतेची मांडणी करणारा सर्जनशील कादंबरीकार आणि चिंतनशील ललितलेखकही ते आहेत. मराठी साहित्याकडे पाहण्याची व्यापक दृष्टी देणारे विचारवंतही ते आहेत. साहित्यातील सृजनाच्या अनेकविध शक्यता लक्षात घेऊन व्यक्त होणारा सर्वव्यापी, श्रेष्ठ प्रतिभावंत म्हणून त्यांनी मराठीत त्यांचे स्थान अधोरेखित केले आहे. दिशा पिंकी शेख या तर भोवतालातील सारी कुरूपता अधोरेखित करणाऱ्या कवी आहेत.''

श्री. डहाके म्हणाले, ''सतीश काळसेकर यांच्या नावे पुरस्कार मिळण्याचा हा क्षण एकाच वेळी आनंददायी आणि वेदनादायकही असल्याचे बोलून दाखविले. सतीश काळसेकर यांनी थोडकीच पण लक्षवेधी, चिरस्मरणीय कविता लिहिली. त्याचप्रमाणे कवितेची दखल घ्यावयास लावणारी समीक्षाही त्यांनी लिहिली.''

दिशा पिंकी शेख म्हणाल्या, ''आमच्या लेखण्यांना सामर्थ्य देण्याचे काम विद्यापीठांनी आणि शिक्षण व्यवस्थेने करावे. विषमतेचे डोस आपण मुलांना लहानपणापासून देतो. आपल्यातला बंधू-भगिनीभाव आता मित्रत्वाच्या, समतेच्या पातळीवर आणण्याची गरज आहे. जेव्हा पोट भरलेलं असते, तेव्हाच पावसातल्या मातीचा सुगंध घ्यावासा वाटत असतो.''

मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पुरस्काराच्या अनुषंगाने भूमिका स्पष्ट केली. मानसी काळसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुष्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

सुप्रिया काळसेकर, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रभा गणोरकर, डॉ. उदय नारकर, डॉ. माया पंडित, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, डॉ. रघुनाथ कडाकणे, तनुजा शिपूरकर उपस्थित होते.

06 AUG 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लिंगभेदाचे राजकारण नाहीसे करण्याची गरज

## प्रा. अविनाश सप्रे; शिवाजी विद्यापीठात डहाके, शेख यांना काळसेकर पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवमुक्तीचा स्वर मोठा होण्यासाठी साहित्यातील आणि समाजातील लिंगभेदाचे राजकारण नाहीसे करण्याची तीव्र गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले. शिवाजी विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या सतीश काळसेकर काव्य पुरस्कार-२०२२ आणि ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार-२०२२ यांच्या प्रदान सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रा. सप्रे यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी व समीक्षक वसंत आबाजी डहाके यांना सतीश काळसेकर काव्य पुरस्कार, तर दिशा पिंकी शेख यांना ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके आणि कवयित्री दिशा पिंकी शेख यांना काळसेकर पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व अन्य.**

प्रा. सप्रे म्हणाले, मी कवी आहे म्हणून मी आहे, असे म्हणणारा ओतप्रोत कवी माणूस म्हणजे डहाके आहेत. दिशा पिंकी शेख या तर भोवतालातील सारी कुरूपता अधोरेखित करणाऱ्या कवी आहेत. त्यांची कविता व्यथा, वेदना, कलह, संघर्ष यांची तर आहेच, पण त्याहूनही ती माणुसकीची कविता आहे, हे महत्त्वाचे.

सत्काराला उत्तर देताना वसंत आबाजी डहाके म्हणाले, अनियतकालिक चळवळीचा कालखंड हा असंतुष्ट आणि वेगळे, सुंदर जग उभा करू पाहणाऱ्या तरुणांचा होता. चळवळींत रस असणारा आणि योग्य राजकीय भान असणारा हा कवी होता. 'माझं मला वाचूद्या,' या त्यांच्या सांगण्यामध्ये 'मला माझं लिहूद्या,' असा सूर होता.

यावेळी दिशा पिंकी शेख म्हणाल्या, कोल्हापूरशी माझे जुने नाते आहे. लढण्याचे बळ देणारी ही भूमी आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी काळसेकर, डहाके आणि शेख यांच्या लेखनातील वाचनाचा आणि वास्तववादी मांडणीचा समान धागा अधोरेखित केला. दुःख, वेदना आणि आक्रंदन म्हणजेही साहित्यच असते, हे या साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून समाजासमोर आणलेले ठळक वास्तव आहे.

यावेळी डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी पुरस्काराच्या अनुषंगाने भूमिका स्पष्ट केली. मानसी काळसेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी सुप्रिया काळसेकर यांच्यासह काळसेकर कुटुंबीय उपस्थित होते.

श्रीकृष्ण महाजन, आर. जी. कुलकर्णी, सुनीलकुमार लवटे, प्रभा गणोरकर, उदय नारकर, माया पंडित, व्यंकाप्पा भोसले, अरुण शिंदे, रघुनाथ कडाकणे, तनुजा शिपूरकर आदी उपस्थित होते.

लोकमत

# 'पर्यावरण अभ्यास' पेपर उद्या

कोल्हापूर : सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र चारच्या पर्यावरण अभ्यास (आवश्यक) याविषयाचा पेपर रविवारी (दि.७) दुपारी १ ते २ यावेळेत होणार आहे. यादिवशीच बी. एस्सी., बी. एस्सी. अथवा एम. एस्सी (नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी), बी. एस्सी (कॉम्प्युटर सायन्स अशा सर्व अभ्यासक्रमांचा पर्यावरण विषयाचा पेपर दुपारी ४ ते सायं. ५ यावेळेत होईल.

पुढारी

# विद्यापीठ ऑफलाईन परीक्षेला ४३ हजार ७९८ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातंर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षेतंर्गत शुक्रवारी ४६ विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ४३ हजार ७९८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

परीक्षा विभागाच्या वतीने महाविद्यालय, विद्यापीठस्तरावरील ५६१ परीक्षांना १९ जुलैपासून सुरुवात झाली आहे. मंगळवारी (दि. २) बीए., बीएस्सी. (फूड अँड टेक्नॉलॉजी, बायो-टेक, आयटी, कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक), बीएस्सी. (आयटी, इन्व्हायरमेंट सायन्स, कॉम्प्युटर सायन्स), एमबीए, बीई, बीएड, एमएस्सी., एलएलएम, बी. आर्किटेक्चर, बीसीए, एमसीए, बी. व्होक., बी. लिब., एम. लिब., बीजे., एमजे आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे उद्या पर्यावरण अभ्यास विषयाचा पेपर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ मधील सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध परीक्षा केंद्रांवर सुरू आहेत. सर्व पदवी अभ्यासक्रमांच्या सत्रासाठी पर्यावरण अभ्यास आवश्यक विषयाचा पेपर दि. ७ ऑगस्ट रोजी दुपारी १ ते २ वेळेत होणार आहे.

बीएस्सी., एमएस्सी. (नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी), बीएस्सी. (कॉम्प्युटर सायन्स, फूड प्रोसेसिंग अँड पॅकेजिंग, फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, फॉरेन्सिक सायन्स, शुगर टेक्नॉलॉजी, बायो-टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, ॲनिमेशन, आयटी, हॉर्टिकल्चर), बी. व्होक. (फौंड्री टेक्नॉलॉजी, ऑटोमोबाईल, प्रिटींग अँड पब्लिशिंग, फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट) अभ्यासक्रमांचा पर्यावरण अभ्यास आवश्यक विषयांचा पेपर दिवशी दुपारी ४ ते ५ या वेळेत आयोजित केला आहे.

इतर सर्व अभ्यासक्रमाच्या या दिवशीच्या परीक्षा नियोजित वेळेत होणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

सकाळ

# पर्यावरण पेपरच्या वेळेत बदल

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातर्फे मार्च/एप्रिल २०२२ मधील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध परीक्षा केंद्रांवर सुरू असून, सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र चारकरिता ७ ऑगस्टला होणाऱ्या पर्यावरण अभ्यास (आवश्यक) विषयाच्या वेळेत बदल केला आहे. हा पेपर दुपारी एक ते दोन ऐवजी दुपारी चार ते पाच या वेळेत होईल, तरी विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.